MHJN060000292016

**नियमित दिवाणी दावा क्रमांक ६/२०१६**
**आशाबाई–वि– इंदुबाई**

**निशाणी क्रमांक ७७ वर आदेश पारीत**

१) प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.६ यांना साक्षीसाठी बोलावणे बाबत परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२) वादी यांचे कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.६ हे वादीतर्फे न्यायालयात साक्ष देणेसाठी तयार आहे. प्रतिवादी क्र.६ या एकमेव निपक्ष साक्षीदार आहेत. तरी त्यांना साक्षीस बोलावणे बाबत परवानगी देण्यात यावी.

३) प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविलेला आहे. प्रतिवादी यांचे कथनाप्रमाणे, प्रतिवादी क्र.६ यांनी प्रस्तुत दाव्याकामी कोणताही लेखी जबाब नोंदविलेला नाही, म्हणून त्यांना प्रस्तुत दाव्याकामी साक्षीदार म्हणून तपासणे योग्य व कायदेशीर होणार नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेत यावा, अशी त्यांनी विनंती केलेली आहे.

४) वादीतर्फे व प्रतिवादीतर्फे सन्माननिय विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केले. अभिलेखाचे अवलोकन केले असता, वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द वाटपासाठी दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र.६ यांनी हजर होऊन त्यांची कैफियत दाखल केलेली नाही. वादी हे प्रतिवादी क्र.६ यांना साक्षीदार क्र.३ म्हणून तपासू इच्छितात. प्रतिवादी क्र.६ देखील त्यास तयार असल्याचे स्पष्ट होते.

प्रतिवादी क्र.६ यांनी कैफियत दाखल करुन प्रस्तुत दाव्यास विरोध दर्शविलेला नसल्याने प्रतिवादी क्र.६ यांची कथने वादींचे कथनाशी विरोधी नाहीत. वाटपाच्या दाव्यामध्ये प्रत्येक वादी हा प्रतिवादी असतो व प्रत्येक प्रतिवादी हा वादी असतो. याउपर सदर साक्षीदार यांनी साक्ष दिल्यानंतर प्रतिवादी यांना त्यांचा उलटतपास घेण्याची संधी राहणार आहे, त्यामुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही, अशा परिस्थीतीत वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे योग्य होईल. सबब, खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**// आ दे श //**

१. वादी यांचा निशाणी क्रमांक ७७ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.६ यांना वादीतर्फे साक्षीदार क्र.३ म्हणून तपासण्यात परवानगी देण्यात येते.

३. या दाव्याच्या पुढील तारखेस वादी यांनी साक्षीदार क्र.३ यांचे शपथपत्र अभिलेखावर दाखल करणेचे आहे.

CHAITANYA SUNILDATTA DESHPANDE

Digitally signed by CHAITANYA SUNILDATTA DESHPANDE
Date: 2023.10.25 17:31:30 +0530

ठिकाण: भोकरदन.
दिनांक:२५/१०/२०२३.

(सी. एस. देशपांडे)
सह दिवाणी न्यायाधीश(क. स्तर),
भोकरदन.